535

# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन, ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर, शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

308
12/04/2021

जा.क्र.झो.पु.प्रा./तां.१/मा.क्र.१७७/६२४ /२०२१ दि. १२ /०४/२०२१.

## अंशतः भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - विकसक मे.आनंद डेव्हलपर्स यांचे इमारत "A" मधील बिगरनिवासी साठी अंशतः भोगवटा प्रमाणपत्राची मागणी. (आ.क्र.७१८ दि.२२/०३/२०२१)

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे सि.स.नं.५६१अ,५६१/ब१,५६१/ब१/अ व ५६२ नाना पेठ,पुणे येथिल झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील इमारतीस या कार्यालयाकडून जा.क्र.३६०/२०२१ दि.२५/०२/२०२१ अन्वये बांधकाम परवानगी देणेत आली आहे. सदरील बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीचे काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील सदनिका साठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत विकसक मे.आनंद डेव्हलपर्स यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार संयुक्त (पुनर्वसन + विक्री) इमारत "A" मधील बिगरनिवासी साठी अंशतः भोगवटा प्रमाणपत्र देणेत येत आहे.

इमारत A (पुनर्वसन व विक्री घटक)

| अ. क्र. | मजले | दुकाने | दुकान क्र. (विक्री घटक) | दुकान क्र. (पुनर्वसन घटक) | एकूण दुकाने |
|---|---|---|---|---|---|
| १) | लोअर ग्राउंड | १ ते ३८ + स्टोअर | दुकान क्र. + स्टोअर २०, २६, ३९ | दुकान क्र. १, २, ३, ४, ५, ६, ७, ८, ९, १०, ११, १२, १३, १४, १५, १६, १७, १८, १९, २१, २२, २३, २४, २५, २७, २८, २९, ३०, ३१, ३२, ३३, ३४, ३५, ३६, ३७, ३८ | ३९ दुकाने + स्टोअर (विक्री घटक) |
| | | | एकूण - ०३ | एकूण - ३६ | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २) | अप्पर ग्राउंड | ३९ ते ६७ + २ मीटर रूम | दुकान क्र. ३९, ४०, ४१, ४२, ४३, ४४, ४५, ४६, ४७, ५३, ५४, ५५, ५६ | दुकान क्र. ४८, ४९, ५०, ५१, ५२, ५७, ५८, ५९, ६०, ६१, ६२, ६३, ६४, ६५, ६६ | २८ दुकाने |
| | | | एकूण - १३ | एकूण - १५ | |
| | | एकूण दुकाने | एकूण -१६ | एकूण -५१ | ६७ |

**पुनर्वसन घटक (विंग A)**

बिगरनिवासी सदनिका - ५१

**एकुण** - ५१

**एकूण पुनर्वसनकरीता बिगरनिवासी** - ५१

**विक्रि घटक (विंग A)**

बिगरनिवासी सदनिका - १६

**एकुण** - १६

**एकूण विक्रि घटक बिगरनिवासी सदनिका** - १६

अटी :-

१) प्रस्तुत बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्याबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, उर्वरित टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

६) इमारतीचे सर्व सिमा भिंत बांधकाम टी.डी.आर. मागणीपूर्वी पूर्ण करून सामासिक अंतराचे संपूर्ण क्षेत्र खुले ठेवणे बंधनकारक आहे.

७) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

८) सदर योजनेसाठी लागू होणारे शुल्क, जसे देखभाल खर्च, आणि पायाभूत सुविधा शुल्क (उर्वरीत ५०% रक्कम) भोगवटापत्र दिल्यापासून एक महिन्यामध्ये आणि टी.डी.आर. मागणीपूर्वी अदा करणे आवश्यक आहे.

**प्र. सहाय्यक संचालक नगररचना**
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

प्रत :- **१) विकसक मे. आनंद डेव्हलपर्स**
बी-१, साधू वासवानी चौक, पुणे रेल्वे स्टेशन जवळ, पुणे.

**२) वास्तुविशारद एस.एम.असो.**
६ श्वेता कॉर्नर, लेन नं. ७, प्रभात रोड, पुणे

**३) संगणक अधिकारी,** झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करणेसाठी